॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.६ (प्रतिनिधी) : शिवराज्याभिषेक दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात गुरूवार दि.६ जून रोजी सकाळी उत्साहात शिवज्योत रॅली काढण्यात आली व त्यानंतर पोवाडा व शिवकालीन प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विचारधारा प्रशाळा, श्री.छत्रपती शिवाजी महाराज अभ्यास व संशोधन केंद्र व सामाजिकशास्त्रे प्रशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवज्योत रॅलीची सुरुवात विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशव्दारापासून झाली. प्रशासकीय भवनाजवळ कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांच्या उपस्थितीत रॅलीचे विसर्जन झाले. तदनंतर श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळयाच्या प्रतीमेचे पूजन करण्यात आले. मु.जे. महाविद्यालयाची विद्यार्थिनी दिसी पाटील हिने खडया आवाजात शिवाजी महाराजांच्या जीवनावरील पोवाडा सादर केला. संगीत साथ संगत विनयराव जाधव व अजय बाविस्कर यांनी दिली. नुतन मराठा महाविद्यालयाची विद्यार्थिनी कल्याणी महाजन हिने दांडपट्टा व काठी फिरवण्याचे प्रात्यक्षिक सादर केले. डॉ. आंबेकडर विचारधारा विभागाची विद्यार्थिनी सुकन्या जाधव हिने जिजाऊंच्या जीवनावर एकपात्री अभिनय सादर केला. कुलसचिव डॉ.विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, रासेयो संचालक प्रा.सचिन नांद्रे, रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. दिनेश पाटील, डॉ.मनोज इंगोले, डॉ.विजय घोरपडे, प्रा. विनेश पावरा, गजानन निळे, सविता सोनकांबळे, अरुण सपकाळे, राजू सोनवणे, कैलास औटी, शिवाजी पाटील, बलभिम गिरी, विलास पाटील, दर्शन नेवे, किरण कुलकर्णी यांच्यासह रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी यांनी उपस्थित होते. विजय बिऱ्हाडे व वैभव बाविस्कर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परीश्रम घेतले.

**बातमी नं. २**

जळगाव दि.६ (प्रतिनिधी) : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या वतीने सामाजिकशास्त्रे प्रशाळेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

रा.से.यो. संचालक डॉ. सचीन नांद्रे यांचे पर्यावरण विषयावर भाषण झाले. पर्यावरणाचे संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.रा.से.यो. जळगाव जिल्हा समन्वयक डॉ. दिनेश पाटील हे अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय घोरपडे यांनी केले. डॉ. कवीता पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. मनोज इंगोले यांच्यासह रा.से.यो. विद्यार्थी उपस्थित होते.

**बातमी नं. ३**

जळगाव दि.२८ (प्रतिनीधी) : दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेऊन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागाच्या वतीने दि. ४ ते ६ जून या कालावधीत विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयांचे क्रिडा संचालक/रासेयो संबंधीत व्यक्तींना ऑनलाईन योगा प्रोटोकॉल प्रशिक्षण देण्यात आले.

२१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा केला जातो. यावर्षी योगा फॉर वुमन ऍम्पावरमेंट अशी संकल्पना घोषीत झाली आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या वतीने ३ दिवस ऑनलाईन स्वरुपात योगा प्रोटोकॉल प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये आसन, प्राणायाम यांचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण देण्यात आले. डॉ.लिना चौधरी यांनी प्रास्ताविक केले. प्रा.गीतांजली भंगाळे यांनी मार्गदर्शन केले.माधुरी तायडे, तुषार सोनवणे, एकनाथ नन्नवरे, रत्नाकर सोनार यांनी सहकार्य केले अशी माहिती प्रभारी विभागप्रमुख इंजि. राजेश पाटील यांनी दिली.

............................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ६ जून, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी